MHCO170002812024

दाखल ता. ०२/०९/२०२४
निकाल ता. ०५/०८/२०२६
कालावधी ०१ वर्षे ११ महिने ०३ दिवस

<u>सहकारी न्यायालय कोपरगांव जिल्हा. अहमदनगर यांचे न्यायालयात</u>

(पीठासीन अधिकारी आर. एन. दांडगे)

ल. मु. नं. २७७/२०२५ नि. ३९

यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित जिल्हा
अहमदनगर, या नावाने धंदा करणारी सहकारी
कायद्यान्वये नोंदलेली सहकारी संस्था हिचा
नोंणी र. नंबर ए. एन आर/ आर.एस.आर/
(सी.आर) १८५ दि. २०/०७/१९९२ मुख्य
कार्यालय श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर जि.
अहमदनगर शाखा संगमनेर, ता. संमगनेर जि.अहमदनगर .... **वादी**

विरुध्द

१) **गणेश दत्तात्रय अनमल**
वय:४३ वर्षे, धंदा: टेलरींग
रा. मालदाड रोड, बालाजी मंदीर जवळ पदमा नगर
संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर

२) **धिरज दिलीप शिंदे**
वय: ४२, धंदा: फोटोग्राफर
रा. बाजारपेठ, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहमदनगर.

३) **सुरेश कुमार कोंतम**
वय:४३, धंदा: पेंटर
रा. मालदाड रोड, पदमनगर, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर .... **प्रतिवादी**

विवाद : रक्कम रुपये ४७,८१२.०२/– वसुलीसाठी.

वादीतर्फे वकील : ॲड. श्री. एस. जी. गेठे
प्र.वादी नं .१ ते : एकतर्फा.
प्र.वादी क्र.३ : ॲड. श्री. अनिल शिंदे
प्र.वादी क्र.२ : स्वत:

न्यायनिर्णय

(दिनांक ०५/०८/२०२६ रोजी घोषित करण्यात आला)

प्रस्तुतचा वाद हा कर्जाची थकबाकी तसेच भविष्यातील व्याज आणि खर्च वसूल करुन मिळण्यासाठी आहे.

वादातील थोडक्यात कथन :–

१. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा व नियमांच्या तरतुदींनुसार नोंदणीकृत सहकारी पतसंस्था आहे. वादी संस्थेचा व्यवसाय तिच्या गरजू सभासदांना कर्ज सुविधा देणे आणि ठेवी स्वीकारणे हा आहे. वादी संस्थेने तिच्या व्यवस्थापन समितीमध्ये ठराव मंजूर करून, तिचे शाखा व्यवस्थापक श्री. स्वप्निल छब्बुराव भांड यांना प्रस्तुत दाव्यावर सही करून तो दाखल करण्यासाठी अधिकृत केले आहे.

२. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्रमांक ०१ ने प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांची वैयक्तिक जामीनकी देऊन दिनांक ०४/१२/२०१९ रोजी रु. ४५,०००/– चे फिक्स लोन कर्ज घेतले. या कर्जासाठी प्रतिवादींनी दिनांक ०४/१२/२०१९ रोजी वादी संस्थेच्या हक्कात आवश्यक कागदपत्रे, जसे की वचनचिठ्ठी, कर्जरोखा इत्यादी करुन दिली व दिनांक ०४/१२/२०२१ पर्यंत १६% व्याजदराने हप्त्यांमध्ये कर्जाची परतफेड करण्याचे मान्य केले.

३. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने कर्जाची रक्कम घेतल्यानंतर कर्जाच्या अटी व शर्तींप्रमाणे परतफेड केली नाही आणि कर्ज खाते थकवले आहे. त्यामुळे

वादी संस्थेने वकिलांमार्फत दि.०१/०६/२०२२ रोजी प्रतिवादींना नोटीस पाठविली. तथापि, प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी नोटीस मिळुनही पैसे भरले नाहीत, म्हणुन वादी संस्थेला हा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

४. पुढे असे कथन आहे की, वादी संस्थेने ठेवलेल्या कर्ज खात्यानुसार, दिनांक ३०/०७/२०२४ अखेर प्रतिवादींकडून रु. ४७,८१२/– येणे बाकी आहे व सदर येणे बाकी प्रतिवादींकडुन वैयक्तिक व संयुक्तिरित्या वसुल होऊन मिळावी अशी विनंती केली आहे.

५. प्रतिवादींना दाव्याचे समन्स काढण्यात आले. समन्स बजावणी अनुषंगाने प्रतिवादी क्र. ०२ स्वतः हजर झाले व त्याने त्यांची कैफियत निशाणी १३ वर दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. ०३ वकिलामार्फत हजर झाले व त्याने त्यांची कैफियत नि.१६ वर दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. ०१ यांना निशाणी १५ नुसार समन्स बजावूनही दाव्याचा बचाव करण्यासाठी हजर झाला नाही, म्हणून दिनांक ०१/०७/२०२५ च्या आदेशानुसार दावा एकतर्फा चालविण्याचा हुकुम पारीत करण्यात आला.

६. प्रतिवादी क्रमांक ०२ ने त्याच्या कैफियतद्वारे असे नमूद केले आहे की, दाव्याच्या परिच्छेद–१ मधील मजकूर अंशतः बरोबर आहे. तथापि, शाखा व्यवस्थापक श्री. स्वप्निल छब्बुराव भांड हे प्रस्तुत दाव्यावर सही करण्यास व तो दाखल करण्यास अधिकृत आहेत, हे नाकारले आहे.

७. पुढे दाव्यातील परिच्छेद–२ च्या मजकुराबाबत असे नमूद केले आहे की, तो मजकूर पूर्णपणे खोटा व चुकीचा आहे. वादीने तो मजकूर सक्त रितीने साबित करावा.

८. पुढे असे नमूद केले आहे की, दाव्यात मागणी केलेली थकबाकी खोटी आणि काल्पनिक आहे. त्यामुळे, हे प्रतिवादी सदर थकबाकी नाकारीत असुन आहे. तसेच सदर प्रतिवादी या थकित रकमेस जबाबदार नाही.

९. पुढे असे कथन केले आहे की, दाव्याचे कारण खोटे व चुकीचे आहे. तसेच, दाव्यातील परिच्छेद ०५ ते ०७ मधील मजकूर नाकारण्यात आला आहे. असे

नमूद केले आहे की, वादीने हा दावा खोट्या बाबीच्या आधारावर दाखल केला आहे व दाव्यात केलेल्या मागणीस पात्र नाही. असे कथन केले आहे की, दाव्यात दाखल केलेल्या कर्जाची कागदपत्रे खोटी व चुकीची असून हे प्रतिवादी नाकारीत आहे.

१०. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ०१ व्यवसायाने शिंपी आहे. प्रतिवादी क्र. ०१ ची प्रतिवादी क्र. ०२ शी चांगली ओळख आहे आणि त्यामुळे त्यांचे संबंध सलोख्याचे होते. वादी संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांचे गणवेश शिवण्याचे काम प्रतिवादी क्र. ०१ ला दिले होते. प्रतिवादी क्र. ०१ ने प्रतिवादी क्र. ०२ ला ओळख म्हणुन काही कागदपत्रांवर सही करण्याची विनंती केली आणि सांगितले की, त्याला वादी संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे गणवेश शिवण्याचे काम मिळवायचे आहे. या प्रतिवादीने, प्रतिवादी क्र. ०१ च्या शब्दांवर विश्वास ठेवून, प्रतिवादी क्र. ०१ च्या दुकानात जाऊन वादी संस्थेच्या काही कागदपत्रांवर सह्या केल्या होत्या.

११. पुढे असे नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने घेतलेल्या कर्जाची या प्रतिवादीला माहिती नाही. हा प्रतिवादी वादी संस्थेचा सभासद नाही किंवा त्याने वादी संस्थेच्या सभासदासाठी अर्जही केलेला नाही. म्हणून असे नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र. ०२ हा वादी संस्थेचा सभासद नसल्यामुळे हा दावा या न्यायालयात चालु शकत नाही व तो फेटाळण्यात यावा.

१२. पुढे असे कथन आहे की, या प्रतिवादीच्या निदर्शनास आले आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ने विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले आहे आणि तो परागंदा झाला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्रमांक ०१ चे कर्ज वसूल करण्यासाठी वादी संस्थेने या प्रतिवादीला त्याच्या कर्जासाठी खोटे जामीनदार म्हणून दाखवले आहे आणि या प्रतिवादीकडून बेकायदेशीर वसुली करण्याचा प्रयत्न करत आहे.

१३. पुढे असे कथन आहे की, वादीला प्रथम हे सिद्ध करण्याचे निर्देश देण्यात यावेत की प्रतिवादी क्र. ०२ हा वादी संस्थेचा सभासद आहे. तसेच असेही नमूद केले आहे की, दर्शविलेली थकबाकी खोटी व बेकायदेशीर आहे. वादीने बेकायदेशीरपणे व्याज आकारले आहे व खोटी थकबाकी दाखविली आहे. त्यामुळे, दावा फेटाळण्यात

यावा अशी विनंती केली आहे.

१४. प्रतिवादी क्रमांक ०३ ने त्याच्या कैफियतद्वारे असे नमूद केले आहे की, दाव्यातील मजकूर, दाव्यात दाखल दस्तऐवज आणि कर्जाचा खाते उतारा खोटे असुन सदरील दस्तऐवज नाकारले आहे. प्रतिवादी क्र.१ ला दिलेले कर्ज वादी संस्थेच्या अधिकार क्षेत्राबाहेरचे आहे व उपविधींच्या तरतुदींचे उल्लंघन करून देण्यात आले आहे. वादी संस्थेने आपल्या मर्यादेच्या पलीकडे आणि कोणत्याही स्थावर मालमत्तेची तारण न घेता कर्ज दिले आहे.

१५. पुढे असे नमूद केले आहे की, वादी संस्था मुद्दलापेक्षा जास्त व्याज वसूल करू शकत नाही. कर्ज रक्कम देतांना कपात केलेली शेअर्स व डिपॉझिट रकमेवरही वादी संस्थेने व्याज आकारले आहे, जे कर्जाच्या रकमेतून वजा करण्यात आले होते. असे कथन आहे की, वादी संस्थेने कर्ज खात्यातील नोंदी योग्यरितीने घेतलेल्या नाही व आकारलेले व्याज चुकीचे आहे. असे कथन आहे की, पतसंस्थांनी जिल्हा सहकारी बँकेच्या व्याजापेक्षा ३% फरकाने व्याज आकारण्याचे असते त्यामुळे १६% दराने आकारलेले व्याज खोटे व बेकायदेशीर आहे.

१६. पुढे असे नमूद केले आहे की, दावा हा मुदतीत दाखल केलेला नाही. असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ यास देण्यात आलेले कर्ज, त्या कर्जाची कागदपत्रे आणि प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिला आहे याची या प्रतिवादीला माहिती नव्हती. तसेच, दिनांक ०१/०६/२०२२ रोजी प्रतिवादींना नोटीस पाठविली हे देखील त्याने नाकारले आहे. त्यामुळे असे कथन करीत आहे की, सदरचा दावा खोटा असून तो फेटाळण्यात यावा.

१७. पुढे असे कथन आहे की, तो वादी संस्थेचा सभासद नाही. त्याने वादी संस्थेकडून कोणतेही कर्ज घेतलेले नाही. तो एका विशिष्ट कामासाठी वादी संस्थेत गेला असता त्यावेळी वादी संस्थेने प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्ज दस्तऐवजांवर त्याच्या सह्या घेतल्या असाव्यात. प्रतिवादी क्र.३ चा असा आरोप आहे की, तो प्रतिवादी क्र. ०१ च्या ओळखीचा नाही व प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिला नाही अथवा प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जासाठी कोणताही कर्ज दस्तऐवज लिहुन दिला

नाही. वादी संस्थेने प्रतिवादी क्र. ०१ सोबत संगनमत करून या प्रतिवादीला फसवुन कर्ज कागदपत्रांवर सह्या घेतल्या आणि त्याला जामीनदार म्हणून दाखवून सदर दस्तऐवजांचा गैरवापर केला.

१८. पुढे असे कथन करीत आहे की, कर्ज प्रतिवादी क्र. ०१ ला देण्यात आले आहे, त्यामुळे सदर येणे प्रतिवादी क्र. ०१ आणि त्याच्या मालमत्तेतून वसूल केले जावे. अशाप्रकारे असे नमूद केले आहे की, त्याच्याविरुद्ध कोणताही निवाडा पारित केला जाऊ नये.

१९. या परस्परविरोधी कथनाच्या अनुषंगाने, मी निशानी–१६ वर मुद्दे निश्चित केले आहे. पुढे, सदरील मुद्दयांना मी माझ्या कारणमिमांसा प्रमाणे उत्तर देत आहे.

अनु. क्र.	मुद्दे	कारणमिमांसा
१.	प्रतिवादी क्र.२ व ३ वादी संस्थेचे सभासद आहेत व प्रस्तुत दावा म. स. का. कलम ९१ प्रमाणे या न्यायालयास चालविण्याचा अधिकार आहे असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
२.	प्रतिवादी क्र.२ व ३ प्रतिवादी क्र.१ च्या कर्जास जामीनदार आहेत व त्यांनी त्या संबंधी कर्ज कागदपत्र वादी संस्थेच्या हक्कात लिहुन दिली आहे असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
३.	प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडुन रक्कम रु. ४७,८१२/- देय आहे व वादी सदरील येणे रक्क्म पुढील व्याज १६% प्रमाणे प्रतिवादी क्र १ ते ३ कडुन वैयक्तिक व संयुक्तिरित्या वसुल करण्यास पात्र आहे असे वादी सिध्द करतात का?	होकारार्थी
४.	काय आदेश व निवाडा	अंतिम आदेशाप्रमाणे

कारणे

२०. वादी संस्थेने आपला दावा सिद्ध करण्यासाठी, निशानी–१७ वर आपले अधिकृत इसम म्हणजेच व्यवस्थापक श्री. स्वप्निल छब्बुराव भांड यांची प्रतिज्ञापत्राद्वारे साक्ष नोंदविली आहे. या साक्षीदाराने निशानी–२१ ते ३७ वर कागदोपत्री पुरावे सादर केले व त्यावर अवलंबून राहिले. वादी संस्थेने निशानी–३८ द्वारे पुरशिस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे. प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांनी त्यांच्या कथनाच्या अनुषंगाने कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. वादी संस्थे तर्फे विद्वान वकील श्री. एस. जी. गेठे यांचा अंतिम युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्रमांक ०२ आणि प्रतिवादी क्रमांक ०३ व त्यांचे विद्वान वकील अंतिम युक्तिवादास अनुपस्थित राहिले. सदरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यांची छाननी करून मी खालीलप्रमाणे मुद्द्यांना उत्तरे दिली आहेत;

मुद्दा क्र. १ बाबत :–

२१. प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी, त्यांच्या कैफियतीद्वारे ते वादी संस्थेचे सभासद असल्याचे नाकारले आहे. या प्रतिवादींचा असा आरोप आहे की, ते वादी संस्थेचे सभासद नाहीत किंवा त्यांनी वादी संस्थेला सभासद होण्यासाठी अर्जही केलेला नाही. त्यामुळे त्यांचे असे कथन आहे की, ते वादी संस्थेचे सभासद नसल्यामुळे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम च्या कलम ९१ अन्वये हा दावा मेंन्टेनेबल नाही व या न्यायालयास सदर दावा चालविण्याचा अधिकार नाही.

२२. वादीच्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याची छाननी केली असता असे, साक्षीत असे आले आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. साक्षीदाराने असे म्हटले आहे की, हे प्रतिवादी वादी संस्थेचे अ–वर्ग सभासद असून त्यांनी सभासद होण्यासाठी अर्ज निशानी–३५ ते ३७ सादर केले आहेत. पुढे अशी साक्ष आहे की, या प्रतिवादींना वादी संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या सभेत सभासद करुन घेण्यत आले होते.

२३. कागदोपत्री पुराव्यांची छाननी केल्यावर असे दिसून येते की, निशानी–३५ ते ३७

वर प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांचे वादी संस्थेचे सभासद होण्यासाठीचे अर्ज आहेत. या अर्जांवर प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांची नावे आणि स्वाक्षऱ्या आहेत. शिवाय, या अर्जांवर दिनांक १७/११/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेत ठराव क्रमांक ०३ द्वारे या प्रतिवादींना सभासद करून घेतल्याची नोंद आहे. या नोंदीवर वादी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक आणि शाखा व्यवस्थापक यांची स्वाक्षरी आहे. या अर्जांवरून असेही दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक ०१ ने रु. ४,५००/– चे शेअर्स आणि प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांनी प्रत्येकी रु. १००/– किमतीचे शेअर्स खरेदी केले आहे. तसेच प्रत्येकी रु. १०/– सभासद शुल्कही भरले आहे.

२४. प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांनी हा तोंडी व लेखी पुरावा खोडून काढलेला नाही. प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांनी त्यांच्या कैफियतमध्ये असे कथन केले आहे की, ते वादी संस्थेचे सभासद नाहीत किंवा त्यांनी वादी संस्थेकडे सभासद होण्यासाठी अर्जही दिलेला नाही. तथापि, निशानी–३५ ते ३७ वरील कागदपत्रे ही प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांची सभासद होण्यासाठी केलेले अर्ज आहेत. या कागदपत्रांवरून हे स्पष्टपणे दिसून येते की, दिनांक १७/११/२०१९ रोजीच्या व्यवस्थापक समितीच्या बैठकीत ठराव क्रमांक ०३ नुसार या प्रतिवादींना सभासद म्हणून प्रवेश देण्यात आला आहे. त्यामुळे, हा तोंडी व लेखी पुरावा सिद्ध करतो की प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत.

२५. आता, दाव्यातील कथनाचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, वादी ही एक नोंदणीकृत सहकारी पतसंस्था आहे. प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. पुढे असा कथन आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने वादी संस्थेकडून रु. ४५,०००/– चे कर्ज घेतले व त्या कर्जास प्रतिवादी क्र. ०२ व ०३ जामीनदार झाले आहेत. तसेच, या प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेच्या हक्कात कर्ज कागदपत्र करुन दिली व दि.०४/१२/२०२१ पर्यंत १६% व्याज दराने परतफेड करण्याचे मान्य केले.

२६.पुढे असे कथन आहे की, प्रतिवादींनी कर्जाच्या अटी–शर्तींनुसार कर्जाची परतफेड

केली नाही व कर्ज खाते थकविले आहे. असे कथन आहे की, वादी संस्थेने ठेवलेल्या कर्ज खात्यानुसार प्रतिवादींकडून रु. ४७,८१२ /– येणे बाकी आहे.

२७. या विधानांवरून हे स्पष्टपणे दिसून येते की, एका सहकारी संस्थेने तिच्या सभासदां विरुद्ध व्याजासह देय रक्कम वसूल करण्यासाठी दावा आणला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम ९१ च्या तरतुदींनुसार, सहकारी संस्थेच्या व्यवसायाशी निगडीत असलेले तिच्या सभासदां विरुद्ध रक्कम वसुलीचे दावे दाखल करता येतात. वादी संस्थेनुसार, ठेवी स्वीकारणे व सभासदांना कर्ज देणे हा तिचा व्यवसाय आहे, त्यामुळे कर्जाची वसुली करणे हा वादी संस्थेचा व्यवसाय होत आहे. तेव्हा म. स. का कलम ९१ (१) (अ) प्रमाणे दावा सभासदां विरुद्ध दाखल करता येतो. तेव्हा माझे असे मत आहे की म. स. का. कलम ९१ कक्षेत हा दावा येत असल्याने तो या न्यायालयाला चालविण्याचा अधिकार आहे. या कारणास्वत माझे या मुद्द्यास उत्तर होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र. ०२ बाबत:–</u>

२८.वादी साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याच्या अवलोकनार्थ असे दिसून आले आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने वादी संस्थेकडे कर्जासाठी अर्ज केला होता. वादी संस्थेने प्रतिवादी क्र. ०१ च्या अर्जाचा विचार करून रु. ४५,०००/– चे फिक्स कर्ज मंजूर केले. प्रतिवादी क्र. ०२ व ०३ या कर्जासाठी जामीनदार राहिले आहे. या प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी दिनांक ०४/१२/२०१९ रोजी वादी संस्थेच्या हक्कात कर्जाची कागदपत्रे म्हणजेच वचनचिठ्ठी, कर्जरोखा, जामीनानामा करुन दिली व वादी संस्थेने प्रतिवादी क्र. ०१ यांना कर्जाची रक्कम वितरित केली.

२९.प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांनी प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिल्योच नाकारले आहे. प्रतिवादी क्रमांक ०२ चा आरोप आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ने त्याला असे सांगितले होते की, वादी संस्थेने त्याला संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे गणवेश शिवण्याचे काम दिले आहे आणि ओळख म्हणुन वादी संस्थेला साक्षीदारांच्या सह्या आवश्यक आहेत. त्यानुसार, या प्रतिवादीनी प्रतिवादी क्रमांक ०१ च्या दुकानात जाऊन वादी संस्थेच्या काही कागदपत्रांवर सह्या केल्या होत्या.

त्यामुळे असा आरोप आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ने वादी संस्थेकडून कर्ज घेतले आहे आणि तो या कर्जासाठी जामीनदार झाला आहे, याची त्याला माहीत नव्हते. म्हणून हा प्रतिवादी कर्जाची कागदपत्रे नाकारतो आहे.

३०. प्रतिवादी क्रमांक ०३ ने त्याच्या कैफियतमध्ये असा आरोप केला आहे की, त्याची प्रतिवादी क्रमांक ०१ शी ओळख नाही. तो एका विशिष्ट कामासाठी वादी संस्थेत गेला होता आणि त्यावेळी वादी संस्थेने प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्ज दस्तऐवजांवर त्याच्या सह्या घेतल्याचे दिसते. असा आरोप आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्ज व्यवहाराशी त्याचा कोणताही संबंध नाही आणि तो प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जासाठी जामीनदार राहिला नाही. वादी संस्थेने फसवणूक करून या प्रतिवादीच्या सह्या प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्ज दस्तऐवजांवर घेतल्या आणि त्या दस्तऐवजांचा गैरवापर केला. तेव्हा प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जाशी कोणताही संबंध असल्याचे नाकारत आहे.

३१. कागदोपत्री पुराव्यांची छाननी केल्यावर असे दिसून येते की, निशानी–२१ वर व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८/०८/२०२४ च्या सभेतील ठराव क्रमांक ०८ ची सत्यप्रत आहे, ज्यामध्ये स्वप्निल छब्बुराव भांड यांना दाव्यावर सही करण्यासाठी, दाखल करण्यासाठी आणि साक्ष देण्यासाठी अधिकार देण्यात आला आहे. पुढे निशानी–२२ वर प्रतिवादी क्रमांक ०१ चा कर्ज अर्ज आहे. या अर्जाद्वारे प्रतिवादी क्रमांक ०१ ने वादी संस्थेकडे रु. ४५,०००/– च्या कर्जाची मागणी केली आहे. पुढे असे दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांची नावे जामीनदार म्हणून दर्शविली आहेत. त्यावर प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांच्या सह्या देखील आहेत. पुढे निशानी–२३ वर वचनचिठ्ठी, निशानी–२४ वर कर्जरोखा, निशानी–२५ वर जामीननामा आणि निशानी–२६ वर करारनामा आहे. या सर्व कागदपत्रांवरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ हे प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जास जामीनदार आहेत. या कागदपत्रांवर प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांच्या सह्या देखील आहेत.

३२. प्रतिवादी क्रमांक ०२ आणि ०३ यांचा आरोप आहे की, या कर्ज दस्तऐवजांवर

त्यांच्या सह्या फसवणुकीने घेण्यात आल्या आहेत. प्रतिवादी क्रमांक ०२ चा आरोप आहे की, वादी संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या गणवेशाच्या शिलाईचे काम मिळवण्यासाठी ओळख म्हणुन सह्या हवी आहेत, असे सांगून प्रतिवादी क्रमांक ०१ ने त्यांच्या सह्या घेतल्या. प्रतिवादी क्रमांक ०३ चा आरोप आहे की, तो एका विशिष्ट कामासाठी वादी संस्थेत गेला होता आणि वादी संस्थेने प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्ज दस्तऐवजांवर त्याच्या सह्या फसवणुकीने घेतल्या. तथापि, हे आरोप सिद्ध करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक ०२ आणि ०३ यांनी वादी साक्षीदाराचा तोंडी अथवा लेखी पुरावा खोडून काढलेला नाही. तसेच, प्रतिवादी क्रमांक ०२ आणि ०३ यांनी प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्ज दस्तऐवजांवर त्यांच्या सह्या फसवणुकीने घेण्यात आल्या आहेत सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. प्रतिवादी क्रमांक ०२ आणि ०३ यांनी निशानी–२२ ते २६ हे कर्ज दस्तऐवज खोटे असल्याचे सिध्द केले. या प्रतिवादींनी त्यांच्या लेखी जबाबात केलेल्या कथनावरुन हे मान्य केले आहे की, त्यांनी या दस्तऐवजांवर सह्या केल्या आहेत. परंतु प्रतिवादी क्रमांक ०२ म्हणतो की, त्याने वादी संस्थेचा गणवेश शिवण्याच्या कामासाठी प्रतिवादी क्रमांक ०१ ची ओळख म्हणुन दस्तऐवजांवर सह्या केल्या होत्या, तर प्रतिवादी क्रमांक ०३ सांगतो की, तो कामासाठी वादी संस्थेत गेला असता संस्थेने प्रतिवादी क्रमांक ०१ शी संगनमत करुन काही दस्तऐवजांवर त्याच्या सह्या फसवणुकीने घेतल्या आणि त्या दस्तऐवजांचा गैरवापर केला. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर, या कर्ज दस्तऐवजांवर त्यांच्या सह्या फसवणुकीने घेतल्या गेल्या होत्या आणि ते प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जासाठी जामीनदार नव्हते, हे सिद्ध करण्याची जबाबदारी या प्रतिवादींवर होती. तथापि, प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांनी कर्ज दस्तऐवजांवर त्यांच्या सह्या फसवणुकीने घेतल्या गेल्या आहेत हे सिद्ध करण्याची जबाबदारी पार पाडली नाही. याउलट, वादीच्या साक्षीदाराचा पुरावा प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी या कर्ज दस्तऐवजांवर सही केल्याचे सिद्ध करतो. वादीच्या साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात म्हटले आहे की, प्रतिवादींनी कर्ज दस्तऐवजांवर त्याच्या उपस्थितीत सह्या केल्या आहेत आणि त्याने त्या

प्रतिवादींच्या सह्या ओळखल्या आहेत. त्यामुळे या तोंडी आणि लेखी पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, वादी संस्थेने प्रतिवादी क्रमांक ०१ ला रु. ४५,०००/– चे कर्ज मंजूर करुन वितरीत केले आणि प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ या कर्जासाठी जामीनदार राहिले आहे. तसेच, या प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेच्या हक्कात सदर कर्जासाठी निशानी–२२ ते २६ ची कर्ज कागदपत्रे करुन दिली आहेत. प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ हे या कर्जासाठी जामीनदार राहिले नाही हे सिद्ध करू शकले नाहीत. प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ हे निरक्षर व्यक्ती नाही म्हणुन त्याच्या सह्या फसवणुकीने मिळवल्या आहेत, यावर विश्वास ठेवता येणार नाही. जेव्हा प्रतिवादी क्र.२ म्हणतात की प्रतिवादी क्र.१ ने वादी संस्थेच्या दस्तऐवजांवर सह्या करण्यासाठी बोलावले आणि प्रतिवादी क्र. ०१ ने त्यावर सही करण्यास सांगितले, असे मानल्यास, ती कर्जाची कागदपत्रे आहेत असा निश्चितपणे निष्कर्ष काढता येतो. तसेच प्रतिवादी क्र.३ असे म्हणत आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ च्या कर्जकागदपत्रावर त्याच्या सह्या घेतल्या. यावरुन माझे असे मत होत आहे की, सदरील कर्जाच्या कागदपत्र प्रतिवादी यांनी वादी संस्थेच्या हक्कात करुन दिल्याचे सिध्द होत आहे. अशाप्रकारे, या तोंडी आणि दस्तऐवजी पुराव्यावरून हे स्पष्ट होते की, वादी यांनी प्रतिवादी क्र. ०२ व ०३ यांनी निशानी–२२ ते २६ या कागदपत्रांवर सही करून प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जा जामीनदार राहिले आहेत. तेव्हा माझे या कारणावरुन या मुद्दास उत्तर होकारार्थी असे आहे.

<u>मुद्दा क्र. ०३ बाबत :–</u>

३३. आपला दावा सिद्ध करण्यासाठी, वादी संस्थेने निशानी–१७ वर आपले शाखा व्यवस्थापक श्री. स्वप्निल छब्बुराव भांड यांची साक्ष नोंदवली. या वादी साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केल्यावर असे दिसून आले आहे की, वादी ही म. स. का. कायदा व नियमांच्या तरतुदींनुसार नोंद असलेली सहकारी पतसंस्था आहे. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८/०८/२०२४ च्या ठरावानुसार त्यांना दाव्यात साक्ष देण्यास अधिकृत करण्यात आले आहे व निशानी–२१ वर त्या ठरावाची प्रत दाखल केली आहे.

३४. पुढे, असा पुरावा आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्रमांक ०१ ने प्रतिवादी क्रमांक ०२ व ०३ यांची वैयक्तिक हमी देऊन वादी संस्थेकडे रु. ४५,०००/– च्या फिक्स लोन कर्जासाठी अर्ज केला. वादी संस्थेने प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्ज अर्जाचा विचार करून, दिनांक ०४/१२/२०१९ रोजी प्रतिवादी क्रमांक ०१ ला रु. ४५,०००/– चे कर्ज मंजूर करून वितरित केले. या कर्जासाठी प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेच्या हक्कात वचनचिठ्ठी, कर्जरोखा, जामीननामा, करारनामा इत्यादी, करुन दिली व दिनांक ०४/१२/२०२१ पर्यंत १६% व्याजासह हप्त्यांमध्ये कर्ज परतफेड करण्याचे मान्य केले. अशाप्रकारे साक्षीदाराने निशानी–२२ ते २६ हे कागदोपत्री पुरावे सादर करुन त्यावर अवलंबून राहिले.

३५. पुढे असा पुरावा आहे की, प्रतिवादी क्रमांक ०१ ने कर्जाच्या अटी व शर्तीप्रमाणे कर्जाची परतफेड केली नाही. त्यामुळे वादी संस्थेने वकिलांमार्फत दिनांक ०१/०६/२०२२ रोजी नोटीस बजावली, तथापि प्रतिवादींनी थकबाकी भरली नाही. पुढे असा पुरावा आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी क्रमांक ०१ चे कर्ज खाते, ठेवले आहे व त्या मध्ये जमाच्या व व्याजाच्या नियमित नोंदी घेतल्या आहे. पुढे अशी साक्ष आहे की, सदर कर्ज खात्यानुसार प्रतिवादींकडून रु. ४७,८१२/– येणे बाकी आहे व निशानी–३३ वर खातेउताराची प्रत सादर केली आहे.

३६. प्रतिवादी क्रमांक ०२ चा आरोप आहे की, वादीने ठेवलेले खाते उतारा अचूक नाही. व्याजाची आकारणी योग्यरित्या केलेली नाही आणि चक्रवाढ प्रमाणे आकारणी केली आहे. पुढे असाही आरोप आहे की, ते प्रतिवादी क्रमांक ०१ च्या कर्जास जामीनदार नाही आणि कर्जाच्या कागदपत्रांवर त्याला खोटी माहिती देऊन सह्या घेण्यात आल्या आहे, त्यामुळे तो कथित थकबाकीसाठी जबाबदार नाही.

३७. प्रतिवादी क्र. ०३ चा आरोप आहे की, प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाशी त्याचा कोणताही संबंध नाही. वादी संस्थेने प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्ज कागदपत्रांवर फसवणूक करून त्याच्या सह्या घेतल्या आहेत. त्यामुळे त्याचे असे म्हणणे आहे की, कर्ज प्रतिवादी क्र. ०१ ला देण्यात आले आहे, म्हणून ते प्रतिवादी

क्र. ०१ कडून वसूल केले जावे आणि त्याला थकबाकीसाठी जबाबदार धरू नये.

३८. प्रतिवादी क्र. ०२ आणि ०३ यांचे हे कथन विचारात घेता, प्रतिवादी क्र. ०२ असा आरोप करत आहे की व्याजाची आकारणी योग्य नाही आणि ते चक्रवाढ प्रमाणे आकारले आहे. प्रतिवादी क्र. ०३ चे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. ०१ च्या कर्जाशी त्याचा कोणताही संबंध नाही. निशानी–३३ वर सादर केलेल्या खातेउताराचे अवलोकनातून असे दिसून येते की, दि. ४/१२/२०१९ रोजी कर्जाची रक्कम कर्ज खात्यात नावे टाकण्यात आली आहे. पुढे, व्याजाच्या नावे नोंदी व परतफेडीच्या जमा नोंदी घेतल्या आहेत. वादीच्या साक्षीदाराची साक्ष आहे की, करारात व्याज १६% होते आणि ते त्रैमासिक पध्दतीने आकारले आहे. अशाप्रकारे, कर्ज खातेउतारात दि. १९/०७/२०२४ अखेर रु. ४७,४५०/– ची थकबाकी दर्शविली आहे. प्रतिवादींनी कर्ज खात्यातील नोंदी खोडुन काढल्या नाहीत किंवा व्याज आकारणी योग्यरित्या केलेली नाही हे सिद्ध केलेले नाही. त्यामुळे, कर्ज खाते उतारातील नोंदी ह्या अखंडीत राहिल्या आहेत. तेव्हा या खातेउतारावरून असे दिसून येते की, दि. १९/०७/२०२४ रोजी रु. ४७,४५०/– ची रक्कम देय आणि थकबाकी आहे. तेव्हा मी या निष्कर्षास येत आहे की, वादीने प्रतिवादींविरुद्ध रु. ४७,४५०/– येणे असल्याचे सिद्ध केले आहे.

३९. पुढे, वादी संस्थेने सदर रकमेवर १६% पुढील व्याजाची मागणी केली आहे. कर्जरोखा व वचनचिठ्ठी मध्ये व्याजदर हा १६% ठरला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम ९६ च्या तरतुदींनुसार, सहकारी न्यायालयाने मंजूर करावयाचे व्याज हे करारानुसार ठरलेल्या व्याजदराप्रमाणे देण्याचे आहे. तेव्हा मी या निष्कर्षास येत आहे की, वादी १६% दराने भविष्यातील व्याजाची मागणी करण्यास पात्र आहे. तेव्हा या कारणमिमांसावरुन माझे या मुद्दास उत्तर होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र. ०४ बाबत:</u>

४०. वरील मुद्द्यांवरील माझ्या कारणमिमांसावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१) वादीचा दावा खर्चासहित मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेला रु. ४७,४५०/– संयुक्तपणे व वैयक्तिकरित्या देण्याचे आहे. तसेच या रकमेवर पुढील व्याज १६% साध्या दराने दि. ०१/०८/२०२४ पासुन ते संपुर्ण रक्कम फिटे पर्यंत देण्याचे आहे.

3) प्रतिवादींनी वादीला दाव्याचा खर्च देखील देण्याचा आहे.

4) येणे प्रमाणे निवाडा करण्यात यावा.

DANDGE RAJU NARAYAN

Digitally signed by DANDGE RAJU NARAYAN
Date: 2026.08.05 12:51:18 +0530

दिनांक : ०५/०८/२०२६
ठिकाण : कोपरगाव

आर. एन. दांडगे
न्यायाधीश
सहकारी न्यायालय, कोपरगाव